सिबिओ ज्यावेळी अनुदान मागणी करते त्यावेळेस अनुदान मागणी ही DIU व RIU कक्षामार्फत PIU कक्षास सादर केली जाते यासंपूर्ण प्रक्रियेस बराचसा कालावधी लागतो. अनुदान वितारणापूर्वी PIU कक्षामार्फत संबंधित बँकेस UPDATED BANK STATEMENT ची मागणी मेल द्वारे करण्यात येते. अशाप्रकारे प्राप्त झालेले UPDATED BANK STATEMENT हे कॉम्पुटर system generated असल्यामुळे त्यावर बँकेचा सही व शिक्का येत नाही व त्याची आवश्यकताही नसते असे नमूद देखील केलेले असते. तरीदेखील या कार्यालया मार्फत बँकेच्या सही शिक्यासह statement प्राप्त करून घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

सिबिओस उप प्रकल्प मंजुरी आदेश दिल्यानंतर सदर सिबिओ आपले उपप्रकल्पास कर्ज मिळणेसाठी प्रस्ताव बँकेत सादर करतात. बँकेकडून आवश्यक कागद पत्रांची पूर्तता झालेनंतर बँक अधिकाऱ्या मार्फत क्षेत्रीय भेट देऊन सदर प्रकरण प्रादेशिक/ झोनल कार्यालयास मंजुरीसाठी पाठवले जाते. झोनल कार्यालयामार्फत देखील सदर प्रकरणाची छाननी व आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर मंजुरी देण्यात येते व त्यानंतर सिबिओ स्वहिस्सा उभारणी करून अनुदान मागणीचा प्रस्ताव जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करतात. जिल्हा अंमलबजावणी कक्षा मार्फत विभागिय अंमलबजावणी कार्यालयास व त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी कार्यालयास प्रस्ताव सादर होतो. प्रकल्प अंमलबजावणी कक्षस्तरावर आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर अनुदान वितरणाची कार्यवाही केली जाते. यासंपूर्ण प्रक्रियेस बराचसा कालावधी लागतो.स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार उपप्रकल्प मंजुरी नंतर अनुदान वितरीत करणे साठी कोणत्या हि स्वरुपाचे कालमर्यादेची बंधन देण्यात आलेले नाही.